मुंबई विद्यापीठ

# University of Mumbai

★ ★ ★ ★ ★

NAAC ACCREDITED

(2001-2006)

***Amongst the Top 500 Universities in the World***

***University with Potential for Excellence***

दिनांक २० ऑक्टोबर, २०११ रोजी झालेल्या
अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

**Minutes of the Ordinary Meeting of the Senate held on 20th October, 2011**

मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

* * * * *

**NAAC ACCREDITED**

**(2001-2006)**

***Amongst the Top 500 Universities in the World***

***University with Potential for Excellence***

दिनांक २० ऑक्टोबर, २०११ रोजी झालेल्या

अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

## Minutes of the Ordinary Meeting of the Senate held on

## 20th October, 2011.

मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.१-२०११ -२०१२

अधिसभा
२० ऑक्टोबर, २०११

अधिसभेची सर्वसाधारण सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षांत सभागृह),येथे गुरूवार दिनांक २० ऑक्टोबर, २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते –

१. डॉ. राजन वेळूकर (*कुलगुरू*)
२. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस्. हांडे
३. प्राचार्य (डॉ.) एम्. एस्. कुहा-डे
४. प्राध्यापक मृदुळ निळे
५. डॉ. (श्रीमती) प्रतिभा ए. गोखले
६. डॉ. दिलीप एस्. पाटील
७. प्राचार्य रविंद्रन कर्थाडी
८. प्राचार्य (श्रीमती) मंजुळा जे. निचाणी
९. प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगावकर
१०. प्राचार्य नारायण एम्. राजाध्यक्ष
११. प्राचार्य मारुती टी. भगत
१२. प्राचार्य राजीव बी. बावधनकर
१३. प्राचार्य दिलीप जी. बोरसे
१४. प्राचार्य दत्ताजीराव य. पाटील
१५. प्राचार्य (श्रीमती) चैताली टी. चक्रवर्ती
१६. प्राचार्य कृष्णा अ. पाटील
१७. प्राचार्य विठ्ठल बी. रोकडे
१८. प्राचार्य (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम्
१९. प्राचार्य (श्रीमती) हर्षा के. मेहता
२०. प्राचार्य (श्रीमती) प्रमिला एस्. राऊत
२१. प्राचार्य सिद्धेश्वर टी. गडदे
२२. श्री. झहीर आय. काझी
२३. श्री. हसमुख डी. रांभीया
२४. श्री. महेश के. म्हात्रे

२५. श्री. वसंतरावजी जी. ओस्वाल
२६. श्री. संजय बी. शेटे
२७. (श्रीमती) कवल ए. वर्मा
२८. श्री. भिकू आर. इदाते
२९. डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम
३०. डॉ. जालिंदर अडसुळे
३१. डॉ. आद्याप्रसाद पांडे
३२. डॉ. हेमंत एम्. पेडणेकर
३३. डॉ.(श्रीमती) संगिता ए. गोडबोले
३४. डॉ. बिंदूप्रकाश बी. मिश्रा
३५. डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार
३६. डॉ. विवेक बी. देशमुख
३७. डॉ. अभय एन्. बांबोले
३८. डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल
३९. डॉ. प्रल्हाद जी. पवार
४०. डॉ. दिपक जी. बीडवई
४१. डॉ. (श्रीमती) माधवी एस्. निकम
४२. श्रीमती आरती प्रसाद
४३. डॉ.(श्रीमती) अनुपमा जे. सावंत
४४. डॉ. विजय एन्. पवार
४५. श्री. चरण सिंग सप्रा
४६. श्री. गजाजन (उर्फ) दिलीप ए. करंडे
४७. श्री. महादेव बी. जगताप
४७. श्री. प्रदीप बी. सांवत
४९. श्री. सुधाकर एस्. तांबोळी
५०. श्री. गणेश एस्. चव्हाण
५१. श्रीमती निलीमा एन्. भुर्के
५२. श्री. संजय टी. वैराळ
५३. श्री. तुषार व्ही. कुमारे
५४. श्री. शशिकांत के. झोरे
५५. श्री. राजन व्ही. कोळंबेकर
५६. प्राचार्य मुरलीधर जी. चांदेकर
५७. प्रा. अंबादास वाय. मोहिते
५८. श्री. प्रकाश व्ही. पागे
५९. श्री. सलीम बी. पटेल

६०. प्रा.(श्रीमती) रुपा शहा
६१. डॉ. राजन मोरेश्वर तुंगारे
६२. डॉ. उदय साळुंखे
६३. डॉ. उल्हास जयराम दीक्षित
६४. डॉ. (श्रीमती) शुभदा ए. जोशी
६५. डॉ. स्टिफन डिसिल्वा
६६. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
६७. डॉ. (श्रीमती) माधुरी के. पेजावर
६८. डॉ. सुरेश के. उकरंडे
६९. डॉ. टी. पी. मधू नायर
७०. श्री. दिलीप दगडू पवार
७१. डॉ. किरण विष्णू माणगांवकर
७२. डॉ. गंगाधर ए. मेश्राम
७३. डॉ. (श्रीमती) सुनिता व्ही. मगरे
७४. डॉ. (श्रीमती) शेफाली आर. पंडया
७५. डॉ. रामभाऊ एम्. बडोदे

सभेची सुरूवात *"वंदेमातरम्"* या गीताने झाली.

➢ **अनुपस्थिती :-**

सर्व प्रथम कुलगुरूंनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने अधिसभेसाठी उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मन:पूर्वक स्वागत आणि अभिनंदन केले, तसेच दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर कुलगुरुंच्यावतीने बोलताना प्रभारी कुलसचिव म्हणाले की, प्राचार्य विष्णू मगरे, डॉ. कुमार संजय, डॉ. बाळकृष्ण भोसले, प्राचार्य (श्रीमती) ॲन्सी जोस यांनी कळविले आहेत की, ते या सभेत उपस्थित राहु शकणार नाहीत आणि त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

अधिसभेने प्राचार्य विष्णू एन्. मगरे, डॉ. कुमार संजय, डॉ. बाळकृष्ण भोसले, प्राचार्य (श्रीमती) ॲन्सी जोस या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

**नविन सदस्यांचे विद्यापीठातर्फे व अधिसभा सदस्यांतर्फे स्वागत :-**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(क्यू) अन्वये मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर महाराष्ट्र विधान परिषदेचे प्रतिनिधी म्हणून श्री. चरण सिंग सप्रा यांचे नामनिर्देशन झाल्याबाबत व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(टी) मधील तरतूदीनुसार मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर, मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रमुखांमधून मा. कुलपतींचे प्रतिनिधी म्हणून डॉ. उदय साळुंखे यांचे नामनिर्देशन झाल्याबाबत विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले व त्यांचेकडुन विद्यापीठाला नक्कीच लाभ होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**श्रध्दांजली:-**

यानंतर कुलगुरूनी श्री. जगदीश खेबूडकर, श्रीमती कमल देसाई, श्री. सुरेश तेंडुलकर, श्री. अशोक रानडे, डॉ. पी.सी. अलेक्झांडर, श्री. जे. सी. डॅनिअल, अॅड. दत्तात्रय पाटील, संगीतकार श्री. श्रीनिवास खळे, डॉ. भ. ग. बापट, श्री. गौतम राजाध्यक्ष, श्री. हरीशचंद्र बिराजदार, श्री. शमशेर राज कपूर (शम्मी कपूर), श्री. नवाब मन्सूर अली खान पतौडी यांच्या दुख:द निधनाबद्दल शोक व्यक्त केला व ते म्हणाले की, सर्व महनीय व्यक्तींचे योगदान महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी व खास करून आपल्यासाठी अमुल्य आहे.

**घडामोडी:-**

कुलगुरूंच्या परवानगीने बोलताना विद्यापीठाच्या घडामोडीबाबत प्रभारी कुलसचिव म्हणाले की, मुंबई विद्यापीठाच्या वेगवेगळया विभागातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर टाकण्यात आली असून कार्यक्रमाची निमंत्रणे सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आलेली आहेत.

**बाब क्र. १. दिनांक १८ व १९ मार्च, २०११ रोजी झालेल्या अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त व दिनांक २४ मार्च, २०११ रोजी झालेल्या विशेष अधिसभेचे इतिवृत्त संमत करणे.**

इतिवृत्ता संबंधी बोलताना कुलगुरू म्हणाले की, अधिसभेच्या इतिवृताची छाननी करण्यासाठी डॉ. बाळकृष्ण व्ही. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. अंबादास वाय. माहिते, डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार, प्राचार्य (श्रीमती) कमला बालसुब्रमण्यम, श्री. गजानन (उर्फ) दिलीप ए. करंडे, यांची समिती गठीत करण्यात आली होती. समितीने विभागाच्या सहकार्याने अत्यंत चांगले व संक्षिप्त इतिवृत्त तयार केल्याबद्दल सर्वच अभिनंदनास पात्र आहेत. यानंतर सभागृहाने देखील त्यांचे अभिनंदन केले.

समितीचे सदस्य प्रा. अंबादास मोहिते म्हणाले की, डॉ. बाळकृष्ण व्ही. भोसले यांच्या नेतृत्वाखाली समिती गठित करण्यात आली होती. प्रोसिंडीग आणि मिनीट्स हे दोन वेगवेगळे भाग असून सभागृहात झालेली चर्चा जशीच्या तशी सीडीच्या रूपाने देण्यात आली आहे. इतिवृत्त हे संक्षिप्तपणे सादर करण्यात आले असून सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने आणखी संक्षिप्त आणि सुस्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

The minutes of the Annual Meeting of the Senate held on $18^{th}$ & $19^{th}$ March, 2011 were confirmed and signed by the Vice-Chancellor subject to the errata which circulated to the members of the meeting printed on **Appendix - I** and the minutes of the Special Meeting of the Senate held on $24^{th}$ March, 2011 were confirmed and signed by the Vice-Chancellor.

**बाब क्रमांक २. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २७(१)(सी) नुसार व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेने विद्याशाखेंच्या अधिष्ठात्यांमधून एका अधिष्ठात्याची निवड करणे.**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २७(१)(सी) नुसार व्यवस्थापन परिषदेवर विद्याशाखेच्या अधिष्ठात्यांमधून एका अधिष्ठात्याची अधिसभेने निवड करण्यासाठी निवडणूक घेण्यात आली.

अधिष्ठात्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवड करण्यासाठी डॉ. सुरेश के. उकरंडे यांचा एकच अर्ज प्राप्त झाल्याने व त्यांचा अर्ज वैध असल्याचे आढळल्याने डॉ. सुरेश के. उकरंडे यांची व्यवस्थापन परिषदेवर कलम अन्वये २७(१)(सी) बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.

**बाब क्रमांक ३. विद्वत सभेच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ साठी बृहत् आराखडा अद्ययावत करण्यासंबंधी केलेल्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(१) अन्वये अधिसभेच्या बैठकीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहेत.**

प्राचार्य (डॉ.) राजपाल एस्. हांडे यांनी व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार पुढील ठरावाची सुचना दिली, त्यास प्राचार्य दत्ताजीराव वाय्. पाटील यांनी अनुमोदन दिले.

"शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ साठी बृहत आराखडा अद्ययावत करण्यासंबंधी विद्वत सभेने दिनांक २६ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(१) अन्वये अधिसभेने मान्य कराव्यात."

बृहत आराखडया विषयी बोलताना कुलगुरू म्हणाले की, ऑक्टोबर, २०१० मध्ये झालेल्या अधिसभेच्या बैठकीत चर्चा करताना बृहत आराखडा पाच वर्षाचा असेल व त्याकरिता एक समिती गठीत करण्यात येईल, त्यानुसार समिती गठीत करण्यात आली आहे. समितीच्या अनेक बैठका झाल्या असून समिती इत्थंभूत माहिती संकलित करून व परिसरातील मागणीचा विचार करून पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार करीत आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमातील तरतुदी लक्षात घेऊन आजच्या बैठकीत एक वर्षाचा बृहत आराखडा सादर करण्यात आला असून अधिसभेच्या पुढील बैठकीत पाच वर्षाचा बृहत आराखडा सादर करण्यात येईल असे ते म्हणाले.

यानंतर कुलगुरूंनी प्राचार्य (डॉ.) राजपाल एस्. हांडे यांना बृहत आराखडयातील महत्वाचे मुद्दे मांडण्याची सूचना केली.

प्राचार्य (डॉ.) राजपाल एस्. हांडे यांनी महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेल्या बृहत आराखडयातील ठळक मुद्दे आणि त्यात व्यवस्थापन परिषद तसेच विद्वत परिषदेने सुचविलेले बदल थोडक्यात स्पष्ट केले.

यानंतर बृहत आराखडयाबद्दल चर्चा करताना काही सन्माननीय सदस्यांनी विरोध दर्शविला व काही सदस्यांनी समर्थन केले आणि काही सन्माननीय सदस्यांनी दुरूस्त्या सुचवून समर्थन केले. सदस्यांनी चर्चेत खालील मुद्दे उपस्थित केले :-

१) बृहत आराखडयात अल्पकालिन व दीर्घकालिन धोरण असावे,

२) संशोधनावर लक्ष केंद्रित करणे,

३) सेंटर ऑफ एक्सलन्सची निवड करणे,

४) इंटरडिसीप्लिनरी स्टडिज व पीएच.डी. गाईडस्‌ला मान्यता देणे,

५) पीएच.डी. इन लेबर स्टडिजमध्ये कायम स्वरूपी क्रेंद्राची स्थापना करणे,

६) जागतिक परिस्थिती, देशातील परिस्थिती, राज्यातील परिस्थिती आणि मुंबईतील परिस्थितीचा अभ्यास करणे,

७) मुंबई विद्यापीठात उपलब्ध असलेली संसाधने, गरजा व मर्यादांचा विचार करणे, विद्यापीठाकडे असलेल्या रिसोर्सेसचा पूर्णत: वापर करणे,

८) केवळ इन्फास्ट्रक्चर व आयटीचा विचार न करणे,

९) आतापर्यंत आलेल्या परीक्षेत महाविद्यालयांना संलग्नता व अन्य प्रशासकीय अडचणी विचारात घेणे,

१०) महाविद्यालयांची वाढ,

११) शिक्षकांच्या नेमणूका,

१२) शिक्षकांना वेळेवर वेतन न मिळणे,

१३) शिक्षकांची परीक्षेच्या कामाकरिता उपलब्धता,

१४) राष्ट्रीय ज्ञान आयोगाचा अहवाल विचारात घेणे,

१५) नविन महाविद्यालये सुरू करण्यावर सरसकट दोन वर्षे बंदी घालावी/घालू नये, बंदीबाबत पुनर्विचार.

१६) गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित न ठेवणे,

१७) दोन महाविद्यालयांमधील अंतर १५ कि.मी. ऐवजी १० कि.मी. करणे,

१८) ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग तसेच आदिवासी व ग्रामीण भागात येथे जास्तीत जास्त शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे

१९) बृहत आराखडा हा पाच वर्षासाठी आहे अथवा तदर्थ आहे हे स्पष्ट करणे,

२०) महाविद्यालयांच्या संख्येसह विविध अभ्यासक्रमांची व विद्यार्थ्यांची संख्याही वाढत असल्याने व त्यावर नियंत्रण ठेवणे जिकीरीचे होत असल्याने त्याचा विचार करणे,

२१) परीक्षेच्या यंत्रणेवर वाढत असलेला ताण विचारात घेणे,

२२) वेळेवर परीक्षेचे निकाल लागण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम तयार करणे,

२३) मनुष्यबळ व तंत्रज्ञानाचा योग्य समन्वय साधून अडचणींवर मात करणे,

२४) अभियांत्रीकी महाविद्यालयांची संख्या मर्यादित ठेवणे,

२५) आदिवासी विद्यार्थ्यासाठी व इतर विद्यार्थ्यासाठी वसतीगृहाची सोय करणे,

२६) पदविका प्राप्त केलेल्या अनेक विद्यार्थ्यांना अभियांत्रीकी पदवीच्या दुस-या वर्षात प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याने नविन अभियांत्रीकी महाविद्यालयांची तरतूद करणे,

२७) विनाअनुदानीत महाविद्यालयांमध्ये अर्हताधारक शिक्षकांची कमतरता व शिक्षकांना अपुरे वेतन यासह अन्य अडचणींचा विचार करता नविन महाविद्यालयांचा समावेश बृहत आराखडयात न करणे,

२८) चांगल्या शिक्षण संस्थांना नविन महाविद्यालय देणे व ज्या संस्था अयोग्य पध्दतीने महाविद्यालये चालवतात व विद्यार्थ्यांना चांगल्या सोयी देत नाहीत त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करणे,

२९) विधी क्षेत्रातील वकीलांची गरज लक्षात घेता विधी महाविद्यालयांची तरतूद करावी,

३०) परदेशी विद्यापीठे मुंबईमध्ये विद्यापीठ परिक्षेत्रात येण्यासंदर्भातील आव्हानांचा विचार करणे,

३१) महाविद्यालयांच्या तपासणीकरीता पाठविण्यात येणा-या स्थानिक चौकशी समितीचे (एल.आय.सी.) काम योग्य प्रकारे व्हावे,

३२) प्राधिकरणांच्या निवडणूकीसाठी घातलेली पीएच.डी. अट रद्द करावी,

३३) मॅनेजमेंट इन्स्टिटयूटमध्ये अर्हताधारक संचालक आणि शिक्षक उपलब्ध व्हावेत यासाठी उपययोजना करावी.

३४) लेबर स्टडीजच्या संस्था व व्यवस्थापन संस्थानी अैद्योगिक संबंध आणि मानव संसाधन विकास एकमेकांकडून शिकण्यासाठी योजना तयार करावी,

३५) मॅनेजमेंट क्षेत्रामध्ये पीएच.डी. अर्हता असलेले पुरेसे तज्ञ उपलब्ध नसल्याने व्यवस्थापन, उद्योग, व्यापार यातील दांडगा अनुभव असणा-या तज्ञांचा शिक्षणक्षेत्रासाठी फायदा करून घ्यावा, तसेच जागतिक स्तरावर अमेरीकेत कार्यरत असलेल्या उच्चस्तरीय ॲक्रेडीटेशन संस्थेच्या (ASCSB) धोरणा नुसार शैक्षणिक दृष्टया पात्र व व्यवसायीक दृष्टया पात्र असे दोन भाग करावे,

३६) आराखडयामध्ये गुणवत्ता, को-करिक्युलर ॲक्टीवीटीज, संशोधन, फॅकल्टी डेव्हलपमेंट, विद्यार्थ्यासाठी रोजगाराच्या संधी इत्यादी बाबींचा विचार व्हावा,

३७) परीक्षा, संलग्नता व अन्य प्रशासकिय विभागील त्रुटी शोधुन त्यावर ठोस उपाययोजना करावी,

३८) व्यवस्थापन विषयात पुरेसे पीएच.डी. गाईड्स उपलब्ध होण्याकरीता उपाययोजना करावी.

३९) दूर शिक्षण विभागाचे काम अधिक प्रभावी करण्यात यावे.

४०) भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थाची अवस्था अत्यंत केविलवाणी असल्याने त्यांना अधिक शैक्षणिक सोयी-सुविधा देण्याबाबत विचार करावा.

४१) विद्यापीठातील अधिका-यांची पदे तातडीने भरावी,

४२) नविन महाविद्यालये देण्याआधी पायाभूत सुविधा, शैक्षणिक व भौतिक सुविधा इत्यादी गोष्टीचा विचार करावा,

४३) विद्यापीठाचे आर्थिक स्त्रोत वाढविण्यासाठी काही शुल्कामध्ये वाढ करणे,

४४) राधाकृष्णन् आयोग, कोठारी आयोग, डॉ. यशपाल समिती, नॅशनल एज्युकेशन पॉलिसी किंवा १९९२ चा ॲक्शन प्लॅन विचारात घेणे,

४५) ग्रॉस एन्रॉलमेंट रेशो, नेट एन्रॉलमेंट रेशो, आणि एन्रॉलमेंट ऑफ इलिजिबल्स वाढविण्याचा विचार करताना ग्रामीण, शहरी, गरीब, मध्यमवर्गीय, जाती, लिंग, धर्म, आदिवासी या सगळयांचा विचार व्हावा,

४६) विद्यार्थी संख्या वाढविताना विद्यापीठाच्या क्षमतेचाही विचार करावा,

४७) विद्यापीठांवरील वाढता भार विचारात घेता विद्यापीठाची प्रादेशिक केंद्रे/उपकेंद्रे किंवा विभाजन करणे व त्या प्रमाणात मनुष्यबळ वाढविणे,

४८) किती विद्यार्थ्यांना नोक-या मिळाल्या हे तपासण्यासाठी एक डाटा बँक तयार करावी तसेच स्टुडंट ट्रकींग सिस्टीम विकसित करावी,

४९) महिला विकास कक्षाची व्याप्ती वाढवावी,

५०) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांमधील प्रवेश क्षमता व प्रवेशीत विद्यार्थी यांचा पाच वर्षाचा आढावा घ्यावा,

५१) पर्यावरण विषयाचा विचार करावा,

हरकतीचा मुद्दा उपस्थित करून प्रा. अंबादास मोहिते म्हणाले की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार अधिसभेला बृहत आराखडा मंजुर करण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार नाही. बृहत आराखडयाबाबत अधिसभा केवळ सूचना करू शकते असे मत त्यांनी व्यक्त केले.

अधिसभेला बृहत आराखडा मंजुर करण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार नाही या हरकतीच्या मुद्दयावर काही सदस्यांनी आक्षेप घेतला.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील विविध कलमांवर चर्चा केल्यानंतर अधिसभेत सादर करण्यात आलेली बाब क्रमांक ३ ''मान्यतेसाठी'' ऐवजी ''सुचनार्थ'' अशी दुरूस्ती करण्यात आली.

त्यानंतर कुलगुरू म्हणाले की, बृहत आराखडयासंबंधी सदस्यांच्या सूचना प्रशासनाकडे पाठविण्यात येतील व त्या सूचनांचा समावेश पुढील बृहत आराखडयात करण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्व घटकांना बृहत आराखडयाच्या समितीमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात येईल असेही ते म्हणाले.

चर्चे दरम्यान काही मिनीटांसाठी कुलगुरूंना सभागृहाबाहेर जायचे असल्याने त्यांनी सभागृहाच्या परवानगीने डॉ. प्रल्हाद जोगदंड यांना सभाध्यक्ष पद भुषविण्याची विनंती केली ती मान्य करण्यात आली.

सभाध्यक्ष म्हणाले की, बृहत आराखडा तयार करताना सर्व संबंधीताना समितीमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात येईल. बृहत आराखडयाबाबत सदस्यांनी त्यांच्या लेखी सूचना पाठविल्यास त्याचा नक्कीच विचार करण्यात येईल.

थोडयावेळाने कुलगुरू सभागृहात आले व आसनस्थ झाले.

बृहत आराखडयावरील चर्चेत डॉ. राजन तुंगारे, डॉ. जालिंदर अडसुळे, प्राचार्य कृष्णा पाटील, श्री. वसंतरावजी ओस्वाल, डॉ. (श्रीमती) माधवी निकम, श्री. सुधाकर तांबोळी, श्री. महादेव जगताप, डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार, श्री. गणेश चव्हाण, डॉ. अभय बांबोले, श्री. संजय वैराळ, डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. विवेक देशमुख, प्राचार्य दिलीप बोरसे, प्राचार्य (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम्, प्राचार्य मारुती भगत, डॉ. दिपक बीडवई, श्रीमती आरती प्रसाद, श्री. प्रदीप सांवत, श्री. गजाजन (उर्फ) दिलीप करंडे, डॉ. उदय साळुंखे, डॉ. बिंदूप्रकाश मिश्रा, प्राचार्य मुरलीधर चांदेकर, डॉ. टी. पी. मधू नायर, प्रा.(श्रीमती) रुपा शहा, श्री. भिकू इदाते, प्राचार्य नारायण राजाध्यक्ष, प्रा. अंबादास मोहिते, डॉ.(श्रीमती) संगिता गोडबोले, डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम, डॉ. (श्रीमती) सुनिता खारीवाल या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

या विषयावरील चर्चेत सर्व सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्यांवर/प्रश्नांवर उत्तर देताना कुलगुरू म्हणाले की, बृहत आराखडया संबंधी सदस्यांनी अत्यंत चांगल्या सूचना केल्या असून त्यांच्या सर्व सूचना महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाकडे पाठविण्यात येतील व नविन बृहत आराखडा तयार करताना त्या सुचनांचा विचार करण्यात येईल. अधिसभा सदस्यांनी केलेल्या विनंतीनुसार विद्यापीठाच्या विकासासाठी अधिसभा सदस्यांची दोन दिवसांची अनौपचारीक बैठक विद्यापीठ परिक्षेत्राच्या बाहेर एका चांगल्या ठिकाणी घेण्यात येईल व त्यात विविध विषयांवर चर्चा करण्यात येईल.

उच्च शिक्षणामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संधी देण्याबद्दल आपण ज्याप्रमाणे चर्चा करीत आहोत त्याचप्रमाणे सर्वच देशामध्ये ही चर्चा सुरू असून, प्रयत्न देखील सुरू आहेत व त्यानुसार योजना आखण्यात येत आहेत. उच्च शिक्षणामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कशी संधी देता येईल याबाबत केंद्र सरकार व राज्य शासनाचे देखील प्रयत्न व उपाययोजना सुरू आहेत. १९४७ नंतर राधाकृष्णन् कमिशनने त्यांच्या अहवालात केलेल्या शिफारसीनुसार देशामध्ये अमंलबजावणी सुरू करण्यात आली होती. त्यानुसार १९४७ मध्ये उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची संख्या २० हजारावरून १ कोटी ३० लक्ष विद्यार्थ्यांपर्यत पोहचली आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठांची संख्या १८५७ साली केवळ तीन होती, परंतु आज ती संख्या ६०० पर्यंत पोहचली आहे व महाविद्यालयांची संख्या ३१ हजारापर्यत आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी पॉलिटेक्निक, आयटीआय, व्यावसायिक शिक्षण, मुक्त विद्यापीठे, दूर शिक्षण अशाप्रकारच्या व्यवस्था निर्माण झालेल्या आहेत.

१८५७ मध्ये  स्थापन झालेल्या तीन विद्यापीठांना देशातील सर्व महाविद्यालये संलग्नीत केली असती तर एवढा मोठा भार विद्यापीठांना पेलणे अशक्य झाले असते म्हणूनच विविध राज्यांमध्ये नवनवीन विद्यापीठांची स्थापना करून त्या त्या ठिकाणची महाविद्यालये परिस्थितीनुसार त्या त्या विद्यापीठांना संलग्नीत करण्यात आली आहेत. नॉलेज कमिशन बद्दल ते म्हणाले की, नॉलेज कमिशनच्या अहवालात विद्यापीठाने संलग्नतेच्या रचनेपासून दूर जाऊन केवळ संशोधनासाठी आणि पोस्ट ग्रॅज्युएशनकडे विद्यापीठाने जास्त लक्ष दयावे अशी शिफारस नॉलेज कमिशनमधून करण्यात आलेली आहे. म्हणून आपल्याला उच्च शिक्षणाच्या धोरणांबद्दल विचार करताना नॅशनल नॉलेज कमिशन, यशपाल कमिटी, राधाकृष्णन् कमिशन, कोठारी कमिशन, नॅशनल एज्युकेशन पॉलिसी १९८६ या सर्वांचा चिकित्सकपणे विचार करण्याची गरज आहे. विद्यापीठ व्यवस्था किती महाविद्यालयांचा भार सहन करू शकते याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे.

ग्रामीण आदिवासी या भागांसाठी काही वेगळया पद्धतीने विचार करून तेथील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. मुंबई विद्यापीठाचा किंवा देशातील उच्च शिक्षणाचा विचार करताना चीन, मलेशिया व अमेरीकेमध्ये उच्च शिक्षणामध्ये कोणत्या घडामोडी घडत आहेत याचाही विचार करणे गरजेचे आहे.

अमेरीकेतील हार्वड या विद्यापीठाचा दाखला देत कुलगुरू म्हणाले की, हार्वड या विद्यापीठाचे वार्षिक अंदाजपत्र १८ हजार कोटी त्याशिवाय ३२ बिलियन डॉलरचा शिष्यवृत्ती फंड असून विद्यार्थ्यांची संख्या केवळ २२ हजार असताना सुद्दा एकही विद्यार्थी वाढविता येणार नाही, असा निर्णय त्या विद्यापीठाने घेतला आहे, यातून आपण नक्कीच बोध घेण्यासारखा आहे.

बृहत आराखडयावर सखोल चर्चा व त्यावर कुलगुरूंनी केलेल्या निवेदनानंतर "असा ठराव करण्यात आला की, विद्वत सभेच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शैक्षणीक वर्ष २०१२-२०१३ साठी बृहत आराखडा अद्ययावत करण्यासंबंधी केलेल्या शिफारशींची नोंद घेण्यात यावी आणि अधिसभेने केलेल्या सूचना महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाकडे पाठविण्यात याव्यात."

यानंतर दुपारच्या जेवणासाठी सभा स्थगित कण्यात आली.

सभा सुरू झाल्यावर चर्चे दरम्यान काही मिनीटांसाठी कुलगुरूंना सभागृहाबाहेर जायचे असल्याने त्यांनी सभागृहाच्या परवानगीने डॉ. प्रल्हाद जोगदंड यांना सभाध्यक्ष पद भुषविण्याची विनंती त्यांनी केली ती मान्य करण्यात आली.

यानंतर सभाध्यक्षांनी श्री. दिलीप करंडे यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडण्याची विनंती केली.

श्री. दिलीप करंडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव खालील प्रमाणे मांडला त्यास श्री. प्रदीप सावंत यांनी अनुमोदन दिले.

"पाश्चात्यांचे अंधानुकरण करताना मुळ गाभ्याला तिलांजली देऊन व तीन वर्षे स्वुस्तावस्था बाळगून धिसाडघाईने महिन्याभरात अध्यादेशातील तरतूदी बेजबाबदारपणे बदलल्याने विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान व शिक्षकांना होणारा मन:स्ताप लक्षात घेता हे सदन १० मिनिटे स्थगित करावे."

मुंबई विद्यापीठाने २०१०-२०११ मध्ये क्रेडीट सिस्टीम सुरू केल्याबद्दल श्री. दिलीप करंडे यांनी सभागृहाचे अभिनंदन केले व त्यात कोणत्याही त्रुटी राहू नयेत व त्रुटींमुळे विद्यार्थी आणि शिक्षकांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागू नयेत अशी अपेक्षा व्यक्त केली. २००८ मध्ये मुंबई, कलकत्ता, मद्रास या तीन विद्यापीठांच्या कुलगुरूंनी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या समोर क्रेडीट सिस्टीमबद्दल स्वाक्ष-या केल्या, परंतु यासंबंधी अद्यादेश तयार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाला अद्याप वेळच मिळालेला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

घाईघाईने क्रेडीट सिस्टीम सुरू करण्याचा निर्णय घेतल्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांना ६० गुणांची थेअरी, ४० गुणांची प्रॅक्टीकल, अटेन्डन्स बाबतचे गुण, परीक्षांचे सुपरविजन, पेपर तपासणे, निकाल तयार करणे इत्यादी अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, कर्मचारी हे सर्वच घटक गोंधळलेल्या परिस्थितीमध्ये आहेत असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षणाच्या व्यतिरिक्त अन्य कल्चरल ॲक्टीविटीज, स्पोर्टस्, एन.एस.एस, एन.सी.सी सारख्या गोष्टींमध्ये त्यांना भाग घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी क्रेडीट सिस्टीमला आपला विरोध नसून उलटपक्षी क्रेडीट सिस्टीम योग्य पद्धतीने लागू झालीच पाहिजे व विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार विविध विषय घेता आले पाहिजेत यासाठी योग्य प्रकारे अद्यादेश असण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. युवराज वाल्मीकी या हॉकीपटटूचा सत्कार लवकरात लवकर आयोजित करण्याची विनंती त्यांनी केली.

श्री. दिलीप करंडे यांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावावर काही सदस्यांनी स्थगन प्रस्तावाच्या बाजूने, काही सदस्यांनी स्थगन प्रस्तावाच्या विरोधात तर काही सदस्यांनी मध्यम मार्गाने आपले विचार मांडले. काही सदस्यांनी क्रेडीट सिस्टीम त्वरित बंद करण्याची मागणी केली.

काही सन्माननीय सदस्यांनी परदेशातील विद्यापीठांमधील उदाहरणे देऊन ही पद्धत म्हणजे दहाव्या मजल्यावरून उडी मारण्यासारखी असून परदेशी विद्यापीठातील क्रेडीट सिस्टीम ही एका विशिष्ट कोर्ससाठी (विषयासाठी) आहे. परंतु आपल्याकडे पूर्ण पदवीसाठी लागू करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच परदेशातील विद्यार्थ्यांची एका वर्गातील नगण्य संख्या व आपल्याकडील अवाढव्य संख्या याबाबत विचार करण्याची गरज असल्याचे सदस्यांनी सांगितले. विद्यार्थी संख्या आणि शिक्षकांची संख्या यांचे प्रमाण योग्य नाही असे काही सन्माननीय सदस्य म्हणाले.

काही सन्माननीय सदस्यांनी क्रेडीट सिस्टीम नंतर व सेमिस्टर सिस्टीम लागू करण्याआधी परीक्षा विभाग आणि शिक्षक यांची एकत्र बैठक घेऊन विविध अडचणींवर तोडगा काढावा अशी सूचना केली. संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या, शिक्षकांची संख्या, सेमिस्टर परीक्षेसाठी शिक्षकांनी प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, प्रकल्प तपासणे, कार्यभार, संलग्न महाविद्यालयामध्ये असलेल्या अपु-या सोयी सुविधा यातील अडचणी मांडल्या.

काही सदस्यांनी क्रेडीट सिस्टीम विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून अत्यंत चांगली असल्याने व त्यामुळे विद्यार्थ्यांना इच्छेनुसार विविध विषय घेणे शक्य होत असल्याने त्यातील त्रृटी दूर करून ती लागू करावी असे मत व्यक्त केले.

२०१०-२०११ पासून बी.ए., बी.कॉम. आणि बी.एससी या अभ्यासक्रमांसाठी क्रेडीट, ग्रेडींग, आणि क्रेडीट सिस्टीम सुरू करण्याआधी सहा ते आठ महिने अधिष्ठाता, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष यांच्या कुलगुरूंसोबत अनेकदा बैठका घेतल्यानंतर व त्यात अनेक विषयांवर चर्चा केल्यानंतरच क्रेडीट, ग्रेडींग, आणि क्रेडीट सिस्टीम २०१०-२०११ पासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असे सदस्यांनी सांगितले व हा निर्णय विद्यापीठाच्या दृष्टीकोनातून अत्यंत चांगला असल्याचेही सांगितले. या सिस्टीममुळे विद्यार्थ्यांकडे असलेल्या नेतृत्व गुणास वाव मिळेल व त्यांच्यात गुणवत्ता वाढेल, असे काही सदस्य म्हणाले. क्रेडीट सिस्टीममुळे एन.एस.एस., एन.सी.सी., स्पोर्टस् व कल्चरल ॲक्टीविटीजमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांना अतिरिक्त क्रेडीट देण्याची सुविधा असल्यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत असल्याचे सदस्यांनी सांगितले.

क्रेडीट सिस्टीम सुरू करून काही महिन्याचाच अवधी झाला असल्यामुळे इतक्या लवकर क्रेडीट सिस्टीमवर आक्षेप घेणे योग्य नाही असे काही सदस्य म्हणाले. सहा महिन्यानंतर यात काही अडचणी आल्यास त्यात नक्की सुधारणा कराव्यात असेही काही सदस्य म्हणाले.

क्रेडीट सिस्टीम बद्दल सर्वच घटकांना पुरेपुर माहिती नसल्याने अधिसभा सदस्यांसाठी कार्यशाळा आयोजीत करण्याची विनंती करण्यात आली.

क्रेडीट सिस्टीम बद्दल सर्व शिक्षकांसाठी पुन्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल अशी माहिती विविध शाखांच्या अधिष्ठात्यांनी अधिसभेत दिली.

व्यवस्थापन अभ्यासक्रमामध्ये अद्याप क्रेडीट सिस्टीम सुरू झालेली नसून, जगामधील घडामोडींचा विचार केल्यास इंटर डिसिप्लीनरीच्या व मल्टी डिसिप्लीनरी पुढे जाऊन ट्रान्स डिसिप्लीनरीचा विचार सुरू झालेला आहे. आपल्या देशात इंडियन इन्स्टिस्टयूट ऑफ मॅनेजमेंट, इंडियन इन्स्टिस्टयूट ऑफ टेक्नॉलॉजी यासारख्या संस्थांमध्ये अशाप्रकारचे शिक्षण सुरू झालेले आहे. जागतिक स्तरावर चीन, कोरिया, जर्मनी या देशात देखील व्यवस्थापन अभ्यासक्रमामध्ये हा बदल झालेला आहे. मुंबई विद्यापीठात देखील व्यवस्थापन अभ्यासक्रमात हा स्तुत्य उपक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याचे सदस्यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात क्रेडीट सिस्टीम सुरू झालेली असून त्याचा विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणामध्ये फायदा होत असल्याचे सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. परंतु क्रेडीट सिस्टीममुळे विद्यापीठाच्या विविध विभागांमधील शिक्षकांवर मोठया प्रमाणावर भार पडत असल्यामुळे संशोधन व पब्लिकेशनसाठी अजिबात वेळ मिळत नसल्याचे सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले.

श्री. दिलीप करंडे यांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावावरील चर्चेत डॉ. उल्हास जे. दीक्षित, डॉ. (श्रीमती) शेफाली आर. पंडया, डॉ. आद्याप्रसाद पांडे, प्राचार्य विठ्ठल बी. रोकडे, प्राचार्य नारायण एम्. राजाध्यक्ष, प्राचार्य सिद्धेश्वर टी. गडदे, श्री. सुधाकर एस्. तांबोळी, डॉ. टी. पी. मधू नायर, श्री. संजय टी. वैराळ, डॉ. गंगाधर ए. मेश्राम, डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद, डॉ. दिपक जी. बीडवई, डॉ. हेमंत एम्. पेडणेकर, डॉ. उदय साळुंखे, प्राचार्य (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम्, डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड, प्राचार्य मारुती टी. भगत, डॉ.(श्रीमती) संगिता ए. गोडबोले यांनी भाग घेतला.

क्रेडीट सिस्टीमशी संबंधीत प्रस्तावावर विविध सदस्यांनी विचार व्यक्त केल्यावर चर्चेस उत्तर देताना माननीय कुलगुरू म्हणाले की, सभागृहामधील जवळजवळ सर्वच सदस्यांनी अत्यंत पोटतिडकिने आपले विचार व्यक्त केले. क्रेडीट सिस्टीम ही नव्याने सुरू झाली असल्याने त्यात असलेल्या त्रृटींचा अभ्यास करून त्या दूर करण्याचा पुर्णपणे प्रयत्न करण्यात येईल.

पोस्ट ग्रॅज्युएशनला क्रेडीट सिस्टीम लागू करताना एक वर्षापासून त्याची सुरूवात झाली असून विविध स्तरांवर चर्चा सुरू असून सर्व घटकांशी चर्चा केल्यानंतर क्रेडीट सिस्टीमवर निर्णय घेण्यात आला आहे. मागील वर्षी क्रेडीट सिस्टीमकरिता १०० पेक्षा जास्त कार्यशाळा घेण्यात आल्या होत्या व त्याची माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर टाकण्यात आली होती.

क्रेडीट सिस्टीमवर अध्यादेश तयार करण्यात आले असून त्यातील अडचणींवर बारकाईने अभ्यास करुन त्याबद्दलही अद्यादेश बनविण्यात येतील. यासाठी असलेल्या समितीमध्ये बाहेरील तज्ञांचा देखील समावेश करण्यात येईल.

यानंतर कुलगुरू म्हणाले की, त्यांनी युएस इंडियन समीट, वॉशिंग्टन येथे काही कुलगुरूं समवेत भेट दिली, यावेळी आय.आय.आटी, आय.आय.एमचे डायरेक्टर, अमेरीकेच्या विद्यापीठाचे प्रेसिडेन्ट (Vice- Chancellor), युएस डिपार्टमेंटचे अधिकारी, युजीसीचे अधिकारी आणि भारत सरकारचे अधिकारी उपस्थित होते. हिलरी क्लिंटन आणि कपिल सिब्बल यांच्या सोबत चर्चा करताना विद्यार्थी आदानप्रदान करण्याविषयी अमेरीका विद्यापीठाचे प्रेसिडन्ट (Vice- Chancellor) यांनी क्रेडिट सिस्टमच्या अडचणी सांगितल्या. विद्यापीठातील विद्यार्थी आदानप्रदान करताना भारतामध्ये क्रेडीट सिस्टीम नसल्यामुळे भारतातील विद्यापीठात शिकलेल्या विद्यार्थ्यांना क्रेडीट देण्यामध्ये अडचणी निर्माण होतात असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावेळी कुलगुरू म्हणाले की, मुंबई विद्यापीठामध्ये २०१०-२०११ पासून क्रेडीट सिस्टीम लागू करण्यात आली आहे, याबद्दल सर्वांनी प्रशंसा केली व काही कुलगुरूंनी मुंबई विद्यापीठाच्या क्रेडिट सिस्टीमची नियमावली मागितली. हा मुंबई विद्यापीठाचा सन्मान आहे.

क्रेडीट सिस्टीममध्ये विद्यार्थ्यांना इच्छेप्रमाणे विविध विषय घेऊन पदवी पूर्ण करता येईल व विद्यार्थ्यांना इंटरडिसीप्लिनरी, मल्टीडिसीप्लिनरी आणि ट्रान्सडिसीप्लिनरी अशा प्रकारे अभ्यासक्रम घेता येतील. ज्या महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, त्या महाविद्यालयांमध्ये कार्यभारानुसार शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे, परंतु क्रेडीट सिस्टीममुळे शिक्षकांवर भार वाढत असल्यास नवीन तंत्रज्ञानाचा (Innovation) वापर करून यावर तोडगा काढणे शक्य होईल. याबाबत विद्यापीठाच्या शिक्षण विभागाला शिकविण्याच्या नवनवीन पद्धतीबाबत कार्यशाळा घेऊन त्या शिक्षकांपर्यंत पोहचविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

इनोवेशनचा संदर्भ देऊन कुलगुरू म्हणाले की, कॅनडामध्ये १ हजार विद्यार्थ्यांना एका क्लासरूममध्ये शिकविण्यात येते. याकरिता विद्यापीठ, व्यवस्थापन, महाविद्यालयीन, प्राचार्य आणि शिक्षकांच्या स्तरावर वेगवेगळया प्रकारच्या दुरूस्त्या करण्याची गरज आहे.
इनोवेशनच्या बाबत कुलगुरू पुढे म्हणाले की, कॉमन वेल्थ ऑफ लर्निग बरोबर ओपन एज्युकेशन रिसोर्सेस तयार करण्यात येत असून आपल्या विद्यापीठातील काही शिक्षकांचा त्यात समावेश असेल. याबाबत दिल्ली येथे होणा-या कार्यशाळेत आपल्या ही विद्यापीठातील शिक्षक सहभागी होण्यासाठी पाठविण्यात येतील.

हॉकीपटू युवराज वाल्मीकीच्या सत्काराबद्दल कुलगुरू म्हणाले की, हॉकीपटटू युवराज वाल्मीकीचा सत्कार विद्यापीठाने आयोजित केला होता, परंतु त्यावेळी युवराज वाल्मीकी परदेशात गेला असल्याने त्याचा सत्कार करता आला नाही. परंतु नोव्हेंबरमध्ये युवराज वाल्मीकीचा सत्कार करण्यात येईल. त्या सत्काराला सर्व सदस्यांनी सहभागी व्हावे अशी विनंती कुलगुरूंनी केली.

त्यानंतर कुलगुरूंनी श्री. दिलीप करंडे यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

कुलगुरूंच्या वरील निवेदनास अनुसरून श्री. दिलीप करंडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव सभागृहाच्या समंतीने मागे घेतला.

यानंतर सन्माननीय सदस्यांनी निवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन, सुरक्षा रक्षकांचे प्रश्न आणि मास्टर ऑफ कम्युनिकेशन ॲन्ड जर्नालिजम विभागातील विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाबाबत डॉ. राजपाल हांडे समितीचा अहवाल इत्यादी प्रश्न उपस्थित केले आणि विद्यापीठ व महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये राष्ट्रगीताचा फलक लावण्यात यावे अशी सूचना केली.

**याबाबत विद्यापीठातर्फे तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे कुलगुरूंनी सांगितले.**

विद्यापीठाने अधिसभेच्या बैठकीची व्यवस्था अत्यंत सुबक पद्धतीने व प्रसन्न वातावरणात आयोजित केल्याबद्दल सन्माननीय सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई- ४०० ०३२
दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२

प्राचार्य (डॉ.) एम. एस. कु-हाडे
प्रभारी कुलसचिव

*संदर्भ बाब क्र. १*

परिशिष्ट - १

**सर्वसाधारण अधिसभा - २० ऑक्टोबर, २०११**

************************************************

***दिनांक १८ व १९ मार्च, २०११ रोजी झालेल्या वार्षिक***

***अधिसभेच्या इतिवृत्तावरील शुध्दिपत्र***

| पृष्ठ क्र. | परिच्छेद क्र. | ओळ क्र. | च्या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|---|---|
| ५ | ३ | ३ | हदयविकाराच्या | हृदयविकाराच्या |
| ६ | ५ | १ | नाटयसंपादा | नाटयसंपदा |
| ७ | ३ | १ | भूंकप | भूकंप |
| ७ | ६ | १ | इंटर्नॅशनल | इंटरर्नॅशनल |
| ८ | ५ | १ | वार्निमित्त | वर्षानिमित्त |
| ९ | ३ | ४ | मिद्दोल | मिशेल |
| ९ | ५ | 2 | अयोजित | आयोजित |
| १० | ३ | ३ | सवसाधन | संवसाधन |
| १० | ५ | ३ | ााह | शाह |
| ११ | १ | ४ | मालद्दो | मालशे |
| ११ | ४ | ६ | ार्मा | शर्मा |
| १2 | 2 | ५ | ाासनाचा | शासनाचा |
| १३ | 2 | ५2 | पुविभूषण | पद्मविभूषण |
| १३ | 3 | १ | विद्यापीठातीच्या | विद्यापीठाच्या |
| १४ | १ | ४ | वाड्क्रयीन | वाड्.मयीन |
| १४ | ३ | १ | पदव्युकार | पदव्युत्तर |
| १४ | ३ | १ | संद्दोधनपर | संशोधनपर |
| १४ | ५ | 2 | कार्यकामध्ये | कार्यक्रमामध्ये |
| १५ | 2 | ४ | ड्रीशीप | फ्रिशीप |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2५ | ६ | १ | परंजपे | परांजपे |
| 2६ | ४ | ११ | येण्याचा | येणा-या |
| ३३ | १ | 2 | जाबाबदार | जबाबदार |
| ३५ | १ | १ | तपशीलावर | तपशीलवार |
| ५९ | ४ | 2 | विभागांच्या | विभागाचा |
| ६३ | ५ | ७ | कमेस्ट्री | केमिस्ट्री |
| ६७ | ५ | १ | यांनी | यांना |
| ७३ | 2 | 2 | बिडवाई | बिडवई |
| ८४ | १ | ३ | पुनवर्सन | पुनर्वसन |
| ८४ | ४ | 2 | दस्ताऐवज | दस्तऐवज |
| १०३ | ३ | १ | दमम्यान | दरम्यान |

प्राचार्य (डॉ.) एम. एस. कृ-हाडे
प्रभारी कुलसचिव

मुंबई ४०० ०३२
२० ऑक्टोबर, २०११.